:- प्रेसनोट -: दि:-११/०४/२०१९

## रात्रीच्या वेळेस लोकांना मारहाण करुन लुटणाऱ्या चोरट्यास अटक

---

दिनांक ११/०४/२०१९ रोजी स्वारगेट पोलीस स्टेशन गु.र.नं. २२०/२०१९, भा.द.वि. कलम ३९२,३२३,३४ मधील तपासामध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अशोक कदम व पोलीस निरीक्षक(गुन्हे) श्री. शब्बीर सय्यद यांचे मार्गदर्शनानुसार तपास पथकातील पोलीस अधिकारी पोलीस उप निरीक्षक श्री. समाधान कदम व तपास पथकातील कर्मचारी असे दाखल गुन्ह्याचा स्वारगेट पोलीस स्टेशन हद्दीत तपास करीत असताना **पो.ना. ७६१० कुंभार यांना मिळालेल्या बातमीवरुन इसम नामे बाळु शहाजी बोराडे, वय २५ वर्षे, रा. इंद्रा वसाहत, गणेशखिंड, औंध, पुणे-०७** यास सणस पुतळ्याजवळील अंड्डाभुर्जी हातगाडीजवळ, सारसबाग, पुणे येथे ताब्यात घेवुन त्याच्याकडे अधिक तपास करता त्याने दाखल गुन्हा हा त्याचा साथीदार नामे अखिल कांबळे याचे मदतीने केला असल्याचे सांगितल्याने त्यास व त्याचा साथिदार अखिल कांबळ यांना दाखल गुन्ह्यात अटक करुन त्याचेकडुन दाखल गुन्ह्यात चोरी करण्याकरीता वापरण्यात आलेली दुचाकी मोटारसायकल,चोरलेला सॅमसंग कंपनीचा J-2 मोबाईल व रोख रुपये असे एकुण ७५,७००/- रुपयाचा माल हस्तगत करण्यात आला आहे.

**सदर कामगिरी पश्चिम प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त श्री रविंद्र सेनगावकर, परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री बच्चन सिंह, स्वारगेट विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री विश्वेश्वर नांदेडकर यांचे मार्गदर्शनाखाली स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री अशोक कदम, पोलीस निरीक्षक गुन्हे श्री शब्बीर सय्यद तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप निरीक्षक समाधान कदम, पोलीस कर्मचारी पोलीस हवालदार दशरथ गभाले, सज्जाद शेख, पोलीस नाईक विजय कुंभार, पोलीस शिपाई मनोज भोकरे, शिवाजी सरक, ज्ञानेश्वर बडे, सचिन दळवी यांनी केलेली आहे.**